Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 07 – 14
DOI: 10.5281/zenodo.8328901
Original Research Article

# मराठवाड्यातील भक्तीपंथ आणि सूफी परंपरा

डॉ. राजू शिवाजी कोंडेकर
संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड ४३१८०६ महाराष्ट्र, भारत
*Corresponding author E-mail:* drkondekar9@yahoo.com

Received: 06 September, 2023 | Accepted: 09 September, 2023 | Published: 11 September, 2023

## प्रस्तावना

आतापर्यंत हिंदू आणि मुस्लिम धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बाजूने बराच अभ्यास झालेला दिसतो. दोन्ही धर्मातील उदयास झालेल्या गुढवादी (Mysticism) भक्ती पंथाचा तौलनिक वा सांस्कृतिक समन्वय दृष्टीने संशोधन फारसे झालेले नाही. सुफी पंरपरा आणि भक्ती संप्रदायातील साधना पध्दती व तत्वज्ञानात बरेच साम्यस्थळे दिसतात. मध्ययुगीन मराठवाड्यातील भक्ती पंथातील संतांच्या विचारात आणि सूफी तत्वज्ञानात कमालीचे साम्य आणि समन्वय झालेले दिसून येते. सुरूवातीच्या पार्श्वभूमी वेगवेगळ्या असल्या तरी त्यात मुलभूत नीतीतत्वांत समानता आहे.[१] सूफी तत्वज्ञान आणि वेदात वा उपनिषदातील मुलभूत तत्वांचे साम्यस्थळे बऱ्याच विद्वानांनी सिद्ध केली आहेत. त्यात झेनर आर.सी. दुसान डीक आणि बाके बिहारी यांचा समावेश होतो. पंडित दातार यांनी आपेगावात जन्मलेल्या प्रसिध्द मराठी संत ज्ञानेश्वराच्या ज्ञानेश्वरीतील तत्वांची तुलना सूफी तत्वज्ञानाशी केली आहे.[२]

**महत्त्वाचे शब्द:** भक्तीपंथ, सूफी परंपरा, संत एकनाथ, हिंदू-तुर्क संवाद, भक्ती-सूफी परंपरा, मुस्लिम मराठी संत

## १. सूफी पंथ व मध्ययुगीन मराठवाडा

मराठवाड्याच्या भौगोलिक सीमा निश्चित नसून कालानुरूप बदललेल्या आहेत. या भागाचा आसफजाही निजाम राजवटीत मराठी भाषिक प्रदेश म्हणून मराठवाडी (वाडा) म्हणत असत.[३] वर्तमान मराठवाड्यात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, उस्मानाबाद, बीड आठ जिल्ह्याचा समावेश होतो. कुंतल, मूलक आणि अश्मक ही

गणराज्ये प्राचीन काळात या भागात अस्तित्वात होती. जालण्याचे डोंगर, अजिंठ्याचे डोंगर व बालाघाट डोंगररांगानी व्यापलेला तसेच दख्खन पठारावरील प्रदेश, बेसाल्ट खडक आहे. मांजरा, पूर्णा व गोदावरी ह्या प्रमुख नद्या आहेत.[४]

सम्राट अशोकाच्या शिलालेखात पेतनिक (पैठण परिसर) जनपदाचा उल्लेख मिळतो. नंद, मौर्य, सातवाहन, चालुक्य, वाकाटक, राष्ट्रकुट, होयसळ, कलचुरी आणि यादवांनी या परिसरात राज्य केले. अजिंठा, वेरूळ, तगर (तेर), भोकरदन, लातूर, कंधार, देवगिरी (दौलताबाद), खुलताबाद, उदगीर, औरंगाबाद, अंबड, नांदेड व औसा ही नगरे प्राचीन व मध्ययुगीन काळात विकसित झाली.[५]

तेराव्या शतकात मराठवाडा परिसरात खिलजी व तुघलक राजवटीने राज्य केले. इ.स. १६१० मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीने विशेषत: मलिक अंबरने औरंगाबादचा विकास केला. दख्खनची बहामनशाही व नंतरच्या पाच शाह्यांनी मराठवाड्यावर राज्य केले. त्यात विजापूरची आदिलशाही, बिदरची बरीदशाही, गोवळकोंड्यांची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही आणि अहमदनगरची निजामशाही इ.स. १६३३ नंतर दौलताबाद सुभा मराठवाड्यासह शहाजहान काळात मुघल साम्राज्यात विलीन केला गेला. त्यानंतर इ.स. १७२४ ते इ.स. १९४८ या काळात दख्खनचा निजाम आसफजाही घराण्याचे मराठवाड्यावर राज्य होते. [६]

सूफी परंपरेनुसार प्रेषित मोहमंदानीच सूफी पंथाची स्थापना केली होती. प्रेषितांना परमेश्वराचा साक्षात्कार दोन प्रकारे झाला असे मानले जाते. एका साक्षात्काराने दृश्य फळ म्हणजे कुराण हे पवित्र ग्रंथ होय. तर दुसरा साक्षात्कार प्रेषितांना समाधी अवस्थेतून झाला आणि ही गुढ विद्या गुरूपरंपरेनेच (पीर-मुदीर-सिलसिला) भक्ताकडे पोहोचविण्यात येते यालाच सूफी परंपरा म्हणतात. ही पीर-मुरीद परंपरा प्रेषितांपासून साखळी बध्द पध्दतीने अखंड चालू आहे. असा विश्वास सुफी व्यक्त करतात.[७]

८ व्या, ९ व्या  शतकानंतर सूफी सिलसिले जगभर पसरलेले दिसतात. इस्लाम या शब्दाचा अर्थ परमेश्वराशी संपूर्ण शरण असा होतो. सूफी पंथांनी भक्तीमार्गाच्या साधना मार्गाने सर्वत्र सांस्कृतिक समन्वय प्रस्थापित करून सूफी तत्वज्ञानाचा प्रसार केला.[८] मोसेस (मूसा), येशू (इसा) आणि मोहम्मद (प्रेषित महंमद) इत्यादी पूर्वीच्या प्रेषितांनीही एकेश्वरवाद व गुठवादी परंपरा जोपासलेली आहे. असे सूफी तत्वज्ञान सांगते.[९]

सूफी या शब्दाला विविध धर्म आहेत. सुफ म्हणजे जाडे भरडे कापड किंवा वस्त्र, सफा म्हणजे स्वच्छ, पवित्र होय. म्हणजे जाडे वस्त्र धारण करणाऱ्या मदिनामधील प्रेषितांच्या मस्जिदीसमोरील चबुतऱ्यावर (सफा) बसून भक्तीत लीन असणाऱ्या भक्तांना सुफी म्हणत. सूफी पंथांचा उदय निश्चित कोठे व केंव्हा झाला याविषयी मतभिन्नता आहे. मात्र त्याचे मूळ स्त्रोत मात्र पवित्र कुराण व इस्लाम धर्म होय. हे निश्चित बाराव्या शतकापर्यंत भारतात सुफी पंथ प्रविष्ट व विकसीत झालेला दिसतो.[१०]

भारतात सूफी परंपरा व भक्ती संप्रदायांचे समन्वय व देवाणघेवाण झालेली दिसते. सूफी तत्वज्ञान व भारतीय वेदात यात बरेच साम्य आहे. भक्ती पंथातील बऱ्याच गोष्टी सुफींनीही स्विकारल्याचे दिसते.[११]

तेराव्या शतकात ही प्रक्रिया मराठवाड्यात झालेली दिसते. दिल्ली येथून प्रयाण करून मुंतजाद्दीन झरझरी बक्श चिश्ती यांनी औरंगाबाद जवळ खुल्ताबाद येथे चिश्तीया सिलसिल्याचा विकास केल्याचे दिसते. तेथे त्यांचा मोठा दर्गाह आहे. तसेच शहा मुईनोद्दीन मौलाना चिश्ती (पैठणजवळ), हजरत नानपाशा मुईनोद्दीन चिश्ती (गंगापूर), गाझी रूक्कुद्दीन चिश्ती (वैजापूर), ख्वाजा बुऱ्हाणुद्दीन गरीब चिश्ती (खुल्ताबाद) इत्यादी सुफी संतांनीही मराठवाड्यात सूफी संप्रदायाचा प्रसार केला. गुरू-शिष्य परंपरा विकसित केली. याशिवाय कादरिया, रफाईया, नक्शबंदिया, चिश्तीया सिलसिल्यांच्या सूफींनी औरंगाबाद, कंधार, अंबड, खुलताबाद, दौलताबाद, परभणी परिसरात सूफी परंपरेचा प्रचार प्रसार केला.[१२]

सूफींचे असंख्य दर्गे मराठवाड्यात जागोजागी स्थापित झालेले आहेत. तेथे आजही उरुस वा जत्रा भरतात. हिंदू आणि मुस्लिम जनता मोठ्या भक्तीभावाने दर्ग्यांना भेटी व नवस फेडतांना दिसतात. ही धर्मनिरपेक्ष समन्वयवादी भावना याच काळात रोवली गेल्याचे दिसते. सूफीची शिकवण सर्वांना समान व शांतीचा मार्ग दाखविणारी परिवर्तनवादी होती. मध्ययुगात अनेक सूफी मदरसे शिक्षण केंद्र व खानकाह (आश्रम) मल्फझ्झान व तफसीर (व्याख्या) वाङ्मय आजही त्यांच्या जीवनचरित्रांची व भक्तीमार्गाची माहिती देतात.[१३]

## २. मराठवाडा व सूफी परंपरा

सर्वप्रथम काश्मीर आणि गंगा यमूना दोआबात भक्तीपंथ व सूफी पंथात समन्वय घडून आला होता. शिखाच्या आदिग्रंथात गुरू अर्जुन देवांनीही बरेच हिंदू व सूफी ओव्या किंवा दोहे समाविष्ट केले आहेत.१४ दक्षिणेत विशेषत: नवव्या शतकार इजिप्तचे सूफी संत नुरूद्दीन हे भारतात येवून औरंगाबादजवळ डोनगाव येथे स्थायिक झाले. त्यानंतर १३ व्या शतकात देवगिरी (दौलताबाद) व खुल्ताबाद येथे दिल्ली व उत्तर भारतातून असंख्य चिश्तीया, कादरीया या सिलसिल्याचे सुफी अवलीया येवून स्थायिक झाले.[१५] याच काळात मराठवाडा परिसरात महानुभाव, वारकरी, नाथ आणि नागेश, दत्त संप्रदाय अस्तित्वात होते. जेवढे जनसामान्य मठ-आश्रमात रमत तेवढेच फकीर, सूफीच्या खानकाहमध्ये रमत, कव्वाली व समा कार्यक्रमातही लोक भाग घेत. बीडमधील धारूरचे शेख महंमद आपल्याला मराठीत भक्तीवाङ्मय रचताना दिसतात. त्यांच्या योगसंग्राम, निष्कलंक बोध, पवनविजय इत्यादी रचना उच्चकोटीच्या आहेत. याशिवाय संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत जनाबाई, विसोबा खेचर, संत गोरा कुंभार, संत एकनाथ इत्यादी संतांनी मराठी भक्ती परंपरा चालवून मराठवाडा भूमी पावन केलेली दिसते. यासह वारकरी, श्री विठ्ठल परंपरा, महानुभाव संप्रदाय व इतर मराठी भक्ती पंथानी परिवर्तनवादी जनसामान्याची भक्ती चळवळ चालविली.[१६]

संत तुकारामांच्या अभंगात कबीरांचा उल्लेख मोमीन म्हणून येतो. संत कबीराना सूफीमताचे ज्ञान त्याना पुरेपूर होते. म्हणून त्यांनी हिंदू आणि मुस्लिम धर्माच्या तथाकथित ठेकेदारांवर त्यांच्या असंहिष्णूतेवर, देव-धर्म, वर्ग व्यवस्था, जात-पात, कर्मकांड, रूढी-परंपरा यावर कडक टिका केली आहे.[१७]

## ३. पैठणचे संत एकनाथ व सूफी परंपरा

गोदावरी नदीच्या तटावर पैठण या ठिकाणी संत एकनाथांचे इ.स. १५३३ मध्ये जन्म झाले. जनार्दन स्वामीकडे दौलताबादला त्यांनी शिक्षा घेतली. मलंग वेषात ईश्वरदर्शन झाल्यावर भागवत धर्माचे तत्वज्ञान मराठी भाषेत लिहिण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. एकनाथी भागवत भावार्थ रामायण, अभंग गाथा इत्यादी प्रसिद्ध् रचना केल्या. त्यांनी इ.स. १५९९ मध्ये समाधी घेतली. येथूनच वारकरी मराठी भक्ती परंपरा व सुफी परंपरेचे समन्वय दिसतो.[१८]

मध्ययुगीन मराठवाड्यातील मराठी वाङ्मयद्वारेही या सांस्कृतिक समन्वयाची माहिती मिळते. संत बहिणाबाईने एके ठिकाणी ज्ञानदेव नामदेव-एकनाथ परंपरेचा मराठी भक्ती परंपरेतील योगदानाचे गौरव करतात. शेख महंमदांनी आपल्या अभंगात चाँद बोधले. स्वामी जनार्दन पंत संत एकनाथ ही परंपरा स्पष्ट केली आहे.[१९]

भारतातील कादरीया सूफी सिलसिलाचे पहिले प्रचारक संत महंमद गौस कादरी यांचे शिष्य (मुरीद) शेख राजे महंमद कादरी हेच शेख महंमदांचे पिता होते. चांदसाहेब कादरी उर्फ चांदबोधले हे राजे  महमंद कादरी यांचे मुरीद होते. पुढे चांद बोधले हे शेख महंमद (गुरूपुत्र) व स्वामी जनार्दनपंत यांचे गुरू झाले. त्यांना दर्गाह दौलताबादच्या पायथ्याशी आजही उभा आहे. स्वामी जनार्दनपंत संत एकनाथांचे गुरू झाले. आणि शेख महंमदांचे शिष्य शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले होते. तर वा.सी.बेंद्रे यांनी प्रसिद्ध् केलेल्या मालोजी भोसले महाराजांच्या चकनाम्यात शेख महमंदांना इनाम दिल्याचे उल्लेख सापडतात.[२०]

## ४. हिंदू-तुर्क संवाद

संत एकनाथांच्या लिखाणातून तत्कालीन धार्मिक मतभेद व संहिष्णू समन्वयवादाचे विचारही समोर आलेले आहेत. त्याचेच मूर्तस्वरूप म्हणजे हिंदू-तुर्क संवाद होय. संत एकनाथांच्या अभंगगाथेत यावर वैचारिक व तात्विंक संवाद चर्चिले गेले आहेत.[२१]

संत एकनाथांच्या काळात हिंदू-तुर्क (मुसलमान) यात धर्मचर्चा झालेली असावी असे वाटते. संत एकनाथांनी रचलेल्या हिंदू-तुर्क संवादावरून या चर्चेची माहिती मिळते. या चर्चेची सुरूवात एकमेकांवरील टिकेद्वारेच होते.

ऐका तुर्का परम मूर्खा | सून रे ब्रह्मन अक्कल गधडे, अशा शिव्यांनी सुरूवात झालेली आहे. प्रचंड चर्चेनंतर दोघांच्याही ठिकाणी परमार्थदृष्टी जागृत होते आणि त्यामुळे त्यांना वादवादंग व्यर्थ वाटतो. ब्राह्मण म्हणे अहो जी स्वामी | वरतुत: एक तुम्ही आम्ही | तुरूक कहे वो बात सही | खुदाकू तो जात नहीं | असे भक्ती तत्वाचा जयजयकर करणारे ज्ञान दोघांच्याही अंत:करणात उदयास येते. ईश्वराजवळ हा हिंदू, हा मुसलमान असा भेद नाही, ईश्वराला जात नाही, सर्वांच्या अंतरंगात एकच ईश्वर आहे, त्यामुळे ब्राह्मण, मुसलमान एकच आहेत. माणूस तेवढाच एक आहे. असे मानवतावादी सर्वधर्म निरपेक्षवादी मत संत एकनाथांनी मांडलेले दिसतात. अशी ही भक्तीमार्गाला आधारभूत असलेली शिकवणच केवळ हिंदू-मुसलमानातीलच नव्हे तर धर्म, पंथ, जात, संप्रदाय, राष्ट्र इत्यादी कारणांनी निर्माण झालेल्या मानवाच्या गटागटातील वैरभाव नष्ट करून त्यांच्यात स्नेहसंबंध उत्पन्न करण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे.[२२]

### ५. भक्ती-सूफी परंपरा व मुस्लिम मराठी संत

मुस्लिम मराठी संत म्हणजे सार्वपंथिय साहित्य मराठी भाषेत लिहिणारे व धर्माने मुस्लिम असणारे मात्र मुस्लीमेतर पंथांवर निष्ठा ठेवणारे संत होत. मध्ययुगीन मराठवाडा व पर्यायाने महाराष्ट्राला सांस्कृतिक इतिहास चाचपला तर असे आढळते की, असंख्य पंथ, उपपंथ, संप्रदाय व परंपरा एकाच वेळी हातात हात घालून मार्गक्रमण करीत होत्या. भारत देशाच्या सामाजिक इतिहासातील महाराष्ट्र याबाबतीत सुवर्णपान मानावे लागेल. महाराष्ट्राने संपूर्ण भारतभूमीच्या सामाजिक इतिहासात प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत आदर्श ठिकाण भूषविले आहे. मुस्लिम मराठी संत, भक्ती परंपरा व त्यातील सूफी प्रभाव संकीर्णपणे पाहावयाचा झाला तर त्यात खालील बाबींचा समावेश करता येईल.

सूफी एकेश्वरवादी आहेत. सर्व सत्ता ही परमात्म्याचीच असे स्पष्ट मत त्यांचे आहे. जगात सर्वत्र तोच आहे. असे ज्ञानदेवाने एके ठिकाणी ज्ञानेश्वरीत सांगितले आहे.  आदिब्रह्मा करूनि | शेवटी मशकू धरूनि | माझे समस्त हे जाणौनि | स्वरूप माझे | वहदानियत (परमात्म्याचे एकत्व) जिक्र (नामस्मरण), तरीका (सुफी भक्तीसाधना मार्गक्रमण) इत्यादी तत्वांशी साम्य असणारे ओव्या ज्ञानेश्वरीत येतात. संकुचित मनाच्या, सांप्रदायिक वृत्तांच्या कट्टर मुस्लिम राजांनी ईश्वराच्या सच्चे भक्त या सूफींना इतिहासात इतिहासात बऱ्याच ठिकाणी छळ केल्याचे आढळते. मध्ययुगीन महाराष्ट्रात चिश्तीया सिलसिला, सुहरावर्दी, कादरी, नक्शबंदी सिलसिला सर्वत्र पसरलेले होते. संत एकनाथांना मलंग वेषात दत्ताचे दर्शन दिल्याचे सांगितले जाते.[२३]

नाथ पंथाच्या विकासात बरेच मुस्लिम संतही समाविष्ट झाले हाते. हजरत रतनहाजी हे एक नाथपंथीयच होते. रावळ नावाच्या नाथपंथीयांच्या शाखेत योगी, जुगी (विणकर), पीर इत्यादी मुस्लिमांचा समावेश होतो.[२४]

प्रसिद्ध एकेश्वरवादी संत शेख महमंद यांनी योगसंग्राम, पवनविजय, निष्कलंक, बोध इत्यादी रचनांमध्ये मराठी भक्ती पंथांविषयी प्रचंड लिखाण केलेले दिसते. सिद्धांतबोध या ग्रंथाचे लेखक शहामुनी हे विठ्ठलभक्त होते.[२५] याशिवाय नागेश पंथाचे प्रसिद्ध् संत सिध्दलिंग हे सूफी पंथाविषयी आदर व्यक्त करतांना दिसतात.[२६] त्यांनी आपल्या नागेशदर्पण या रचनेत काही दख्खनी पदे रचली आहेत. ज्ञानगिरीवर देखानूर| हाजर हुजूर | पीर पैगंबर | मुनीश्वर | सूफी कलंदर | सय्यद शेख दोस्त बेहस्त, अगोचर| देखत करार नाजिर फकीरा हरदम मांमूद दरबार | ज्ञानगिरीपर | याशिवाय नागेश संप्रदायात जंगली फकीर, सय्यद हुसैन आलमखान (अल्लखाँ) हे मुस्लिम संत होवून गेले.[२७]

सुफी परंपरा व वारकरी भक्ती पंथातील अनेक साम्यस्थळे आढळून आलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या तत्कालीन सौहार्दपूर्ण संबंधांना समन्वय म्हणल्यास चूक होणार नाही.

शहा महंमद बहामनी उर्फ मृत्यूंजय नावाचे एक मुस्लिम मराठी संत इ.स. १५१८-१५५८ या दरम्यान होवून गेले. वि.का. राजवाडे यांच्या मते त्यांचा काळ संत एकनाथांच्या जन्मापूर्वीचाच असावा. त्यांनी सिध्दसंकेतप्रबंध, अनुभवसार, अद्वैतप्रकाश इत्यादी रचना केल्या. मराठवाड्याच्या सिमेलगत बिदर भागात त्यांचे वास्तव्य होते. कादरीया सूफी

सिलसिल्याचे हेही ते अनुयायी होते. त्यांच्या पंजीकरण नावाच्या ग्रंथात दख्खनी हिरीतील दोहे दिसतात. शाह मुतबजी | जिनमें नही मनमानी | पंजीकरणका खोज किये | हिंदू-मुसलमान येक कर दिये ||

हुसेन अंबरखान हे भगवद् गीतेवर मराठी भाष्य (टिकाड) लिहिणारे पहिले मुस्लिम संत होत (इ.स. १६५३) त्यांचे वडील औरंगाबाद जवळील दौलताबाद किल्ल्यात अधिकारी होते. शेख चाँद बोधले, स्वामी जनार्दनपंत व संत एकनाथ परंपरेचे ते पायीक होते. याशिवाय बीडजवळील धारूर येथे जन्मलेले शेख महंमद श्रीगोंदेकर (इ.स. १५६० ते १६६०) यांनीही भक्तीवर योगसंग्राम, पवनविजय, निष्कलंक बोध, रूपके, भारूडे, अभंग इ. वाङ्मय मराठीत लिहिले आहेत. शेख महंमद गौस कादरी-शेख राजे महमंद कादरी, शेख चाँद बोधले, शेख महंमद श्रीगोंदेकर या परंपरेशी जोडलेले होते.

शेख चाँद बोधले हे जनार्दनपंतांचे गुरू होते आणि संत एकनाथ स्वामी जनार्दनपंतांचे शिष्य होते.[२८]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही सूफींना, सूफी दर्ग्यांना इनाम दिले जात. तुकारामाच्या गाथेत एके ठिकाणी जिकिर करो अल्लाकी बाबा सवल्या अंदर मेस | तुका जो नर बुझे सोहि दरवेज | म्हटले आहे.[२९] राजे, सरदार व प्रजाही सूफी पीरांच्या दर्ग्यांना जात असत. आजही सूफींच्या मल्फूज वाङमयातून मध्ययुगीन महाराष्ट्राची सामाजिक सांस्कृतिक व राजकीय माहिती मिळते. पुण्यातील सय्यद सआदात व शेख सल्लाह् दर्ग्यांना मराठा सरदार नियमित जात. सरकारी तिजोरीतून खैरात खर्च फकीरांना दानधर्म म्हणून दिला जाई. मराठा सरदार यशवंतराव होळकरांसारखे मातब्बर व्यक्ती दिल्लीच्या कुतुबुद्दीन बख्तियार काकींच्या दर्ग्याला वार्षिक भेट देत.

अशा प्रकारे मध्यकालीन मराठी राजवटीत धार्मिक व सांस्कृतिक समन्वयाचे वातावरण होते.[३०]

**निष्कर्ष**

१. मध्ययुगीन भक्ती परंपरेने परमेश्वराच्या स्वरूपासंबंधीच्या प्रचलित असलेल्या भ्रामक श्रद्धा आणि समजूती दूर केल्या. समाजात एकेश्वरवादाला चालना दिली.
२. धार्मिक कर्मकांडाच्या नावे चालू असणारे अनाचार बंद केले.
३. सुफी, वारकरी, नाथ, महानुभाव, नागेश व उत्तर भारतातील इतर भक्ती पंथांनी सर्वमान्य आणि सामाजिकदृष्ट्या नैतिक मूल्यांवर अधिष्ठीत अशा उपासना पद्धतीचा मार्ग दाखविला.
४. आजही सुफी दर्ग्यांना व संत समाध्यांना हिंदू-मुस्लिम समसमान संख्येने हजर राहतात. विविध पंथीय जत्रा, उरूस या समारंभांमध्ये धर्मनिरपेक्ष वातावरणाला भरती आलेली दिसते.
५. सुधारणावादी संतांनी ही सामाजिक क्रांती त्याच काळात केलेली दिसते.
६. या विविध परंपरांनी मराठवाडा व पर्यायाने महाराष्ट्र व संपूर्ण भारतात भव्य आणि उदात्त मानवतावादाचे अधिष्ठाण असलेले त्यांचे तत्वज्ञान मांडले.
७. लौकिक कर्मालाच भक्तीचे रूप देवून सत्य विचारांचा प्रसार केला. उभय पंथांमधील साम्यस्थलांमुळे त्यात अजून बंधूभाव निर्माण झालेला दिसतो.

८. महाराष्ट्रातील भक्तीच्या वाटेने मराठी संतांचा मेळावा भगवंताचा जयघोष करीत चालला होता. त्या मेळाव्यात हे मुसलमानी सूफी संतही मिसळून गेले. एकरस झाले.

९. धर्मापलीकडे जावून एकेश्वरनिष्ठा व मानवतावादाचा पुरस्कार या सूफी व भक्ती चळवळीने केलेला दिसतो.

१०. १९ व्या शतकात ब्रिटीशांनी केलेल्या "फोडा व झोडा" या नीतीच्या कुप्रभावाने इतिहास लिखाणाला वेगळे वळण लागत गेलेले दिसते.

११. आज या संस्कृती समन्वयाची, साधर्म्याची, राष्ट्रीय एकात्मतेचा व धर्मनिरपेक्षतेच्या इतिहासाचे पुनर्लेखन करणे आवश्यक झालेले दिसते.

**संदर्भसूची**


१. Zaehner, R.c (1972), Hindu and Muslim Mysticism, Schocken Books, New Yark, pp-1, 21

२. व्यंकटेश माधव दातार (१९३६), श्री ज्ञानेश्वरी आणि सूफी पंथ, श्री ज्ञानेश्वरी भाग २ मध्ये, संपादक देशमुख, नां.बा. वाङमयोपासक मंडळ, अहमदनगर पृ. १९९ ते पृ. २९४

३. गाडगीळ गंगाधर (मे-जून २००६), मराठवाड्याची विद्वतांची वैभवशाली परंपरा, प्रतिष्ठानमध्ये मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, वर्ष १३ वे अंक ६, पृ. ४

४. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपादक) (१९८४), मराठवाडा मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई.

५. सांकलिया, एच.डी. व माटे, श्री. म. (१९७६), महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई पृ. ४९-५८

६. काटे, पी.व्ही. (१९९९), मराठवाड्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद पृ. ९६

७. पगडी सेतू माधवराव (१९७४), मुस्लिम समाजातील अध्यात्मदर्शन सूफी संप्रदाय, तत्वज्ञान आणि कार्य, परचुरे प्रकाशन, मुंबई पृ. १ ते ३

८. Sowards, I. Kelley (1961), Makerts of world History, vol. Ist Martin's press, New York, p. 145

९. व्यंकटेश माधव दातार, पूर्वोक्त, पृ. २०३

१०. प्रा. डॉ. ग.ना.जोशी, (१९८२), भारतीय तत्वज्ञानाचा बृहद इतिहास (खंड ८), मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पूणे पृ. १७६

११. पांडे, शांता (१९५५), भारतवाणीमध्ये, मध्यकालीन भारत-एक सम्यकदृष्टी, एशिया पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली/मुंबई पृ. ५५२

१२. पगडी सेतु माधवराव (१९७४), मुस्लिम समाजातील अध्यात्मदर्शन सूफी संप्रदाय, तत्वज्ञान आणि कार्य, परचुरे प्रकाशन मुंबई, पृ. ५७

१३. Shaikh, Musak Rajjak (2006), "A Historical Study of Sufi Dargaha in kondhar (Deccan)", Shivaji University, Kolhapur, pp-220

१४. Prof. Sherwani, H.K. (1963), “Cultural Synthesis in medieval India”, Journal of Indian History, Vol. XLI, Page-I Serial No. 121 University of Kerala, pp. 258, 59

१५. पानसे, मुं.ग. (१९६०), यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई पृ. १४६

१६. काटे, पी.व्ही. (१९९९), मराठवाड्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. २३४ ते २३६.

१७. डॉ. देशमुख उषा (१९९४), संत साहित्य दर्शन, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे पृ. १७० ते १७३

१८. Deshpande, M.s. (1976), Saint Eknath, Light for Life Divine, Shri Eknath Sanshodhan Mandir, Aurangabad, p. xviii

१९. रेळेकर, नि.ना. प्राचार्य (२००४), वारकरी संप्रदायी वाङमय मध्ययुगीन धर्मसंप्रदाची वाङमय एक विहंगदर्शन, (संपादक), डॉ. मुकुंद दातार स्नेहल प्रकाशन पुणे पृ. १३४

२०. वा.सी. बेंद्र संपादित सिजरा-जाडी-कादिरी व शेख महंमद बाबा कविता संग्रह, पृ. १२३

२१. Rizvi, S.A.A. (1978), A History of Syfismin India Vol. I, Munshigam Manoharlal. Pub. New Delhi, p. 356

२२. श्री एकनाथ महाराज यांच्या अभंगांची गाथा, (श्री भानुदास व श्री जनार्दन यांच्या अभंगांसह सांप्रदायिक), ब्र. श्री. साखरे (संपादक), आवृत्ती चवथी, १९५२ इंदिरा प्रकाशन, पुणे पृ. ४१२

२३. डॉ. देशपांडे अ.ना. (१९७३), प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, भाग-२, व्हिनस प्रकाशन पूणे पृ. १०९

२४. प्रा. डॉ. ग.ना.जोशी (१९८२), भारतीय तत्वज्ञानाचा बृहद इतिहास (खंड-८) मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, पृ. ३९

२५. डॉ. पठाण यु.म. (१९८१), मुस्लीम संतकवी व श्री विठ्ठल महाराष्ट्राची सतवधारा (संपादक), गो.म. कुलकर्णी, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे पृ. २०५

२६. प्राचार्य रेळेकर नि.ना. (२००४), वारकरी संप्रदायी वाङमय मध्ययुगीन धर्मसंप्रदाची वाङमय एक विहंगदर्शन, (संपादक) डॉ. मुकुंद दातार, स्नेहल प्रकाशन पुणे पृ. १९

२७. डॉ. पठाण यु.म. (१९८१), मुस्लिम संतकवी व श्री विठ्ठल महाराष्ट्राची सतवधारा (संपादक) गो. म. कुलकर्णी, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे पृ. २३८

२८. डॉ. देशपांडे अ.ना. (१९७३), प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास भाग-२ व्हीनस प्रकाशन पुणे पृ. १२६

२९. शिवछत्रपती इतिहास आणि चरित्र खंड-०१, संपादक मंडळ (प्रास्ताविक), शिवचरित्र समिती, मराठा मंदिर, मॅकमिलन प्रकाशन पुणे पृ. ३२

३०. Prof. Mujumdar, R.C. (Edi) (1977), The Maratha Supremasy, Bombay, Bharatiya Vidya Bhavan, pp. 17.